# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २२–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. सोमनाथ एकनाथ कदम ,<br>मु. पो. खैंराव, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सोमनाथ एकनाथ कदम, खैंराव, ता. जत, यांनी शेतीपंपासाठी वीज पुरवठा मिळावा म्हणून दिनांक २७.१२.२००७ प्रोसेसिंग फी भरुन अर्ज दाखल केला आहे. ग्राहकाने करावयाच्या खर्चाचे चलन न मिळाल्याने प्रथमत: अंतर्गत तक्रार निवारण कक्षात व नंतर ग्राहक तक्रार निवारण मंच येथे ११.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली.

तक्रार दाखल करुन घेवून वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व २३.३.२०१० रोजी मच कार्यालयात सुनावणी निश्चित केली. तथापि वि.प.च्या विनंतीनुसार सदरची सुनावणी ६.४.२०१० पर्यंत पुढे ढकलून ६.४.२०१० ला सुनावणी घेतली. सुनावणीच्यावेळी ग्राहक प्रतिनिधी व वि.प.चे प्रतिनिधी उपस्थित होते.

माहे ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात मा. अध्यक्ष व ग्राहक सदस्य यांची पदें रिक्त असल्याने व तक्रार होण्याचे प्रमाण जास्त असल्याने सुनावणी नंतरही निर्णयास विलंब झाला आहे.

अंतर्गत कक्षाचा निर्णय, ग्राहकाची तक्रार, वि.प.चे म्हणणे, सुनावणी दरम्यानची कथने या सगळ्यांचा एकत्रित विचार करुन मंच खालील निष्कर्षाप्रत पोहोचला आहे.

श्री. सोमनाथ एकनाथ कदम यांनी शेती वीज पंपासाठी दि. २७.१२.२००७ रोजी रु. ५०/– प्रोसेसिंग फी भरुन मागणी अर्ज दाखल केला आहे त्यास वि.प.ने मुद्देनिहाय अभिप्राय दुजोरा दिला आहे. तथापि जास्तीत जास्त ३० दिवसांचा कालावधी गृहीत धरला तरी २६.१.२००८ पर्यंत चलन मिळावयाचे होते. मात्र तशी कृती वि.प.कडून घडलेली नाही. तसेच मुद्देनिहाय अभिप्रायात दाखल अर्ज दिनांका शिवाय इतर कोणताही खुलासा वि.प.ने केलेला नाही. अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने आदेश पारित करतांना ढोबळमानाने व संक्षिप्त स्वरुपाचा आदेश देवून ग्राहकावर एकप्रकारे अन्यायच केलेला आहे. आदेशात स्पष्टता असती तर ग्राहकास मंचापुढे येण्याची आवश्यकता नव्हती परंतु आदेश तसा न झाल्याने ग्राहकास पुढील कार्यवाही करावी लागली हे मंचास खेदाने नमूद करावे लागत आहे. त्याचप्रमाणे सुनावणीच्यावेळी श्री. मैंलापुरे, कनिष्ठ अभियंता यांच्याकडे सहाय्यक अभियंता यांचा चार्ज असल्याचे नमूद करुन अशीच अवस्था संपूर्ण सेक्शनमध्ये व विभागामध्ये असल्याचे वि.प.च्या प्रतिनिधीनी नमूद केले. तसेच रेग्युलर चार्जशिवाय दुसऱ्याही सेक्शनचा चार्ज अधिक सहाय्यक अभियंता यांचा चार्ज अशी वेगवेगळी कामें करावी लागत असल्याचे नमूद केले. परंतु चलन देण्यास इतका विलंब का झाला याचा समाधानकारक खुलासा वि.प.च्या संबंधित प्रतिनिधींनी देता आला नाही. श्री. मैंलापुरे यांच्या कथनानुसार आताच्या स्थितीत चार्ज आहे हे खरे तथापि मंचाच्या कामकाजाकडे बघण्याचा दृष्टीकोन वि.प.चा योग्य नसल्याचे मंचास वाटत आहे. मंचाने वि.प.कडे मुद्देनिहाय अभिप्रायाची रितसर मागणी नोंदवून दि. ६.४.२०१० पर्यंत मुद्देनिहाय अभिप्राय प्राप्त झालेला नाही तो मंचास मागणी करुन प्राप्त करुन घ्यावा लागला आहे हीही गोष्ट खेदाची व चिंताजनक आहे. या सर्व बाबींचा वि.प.च्या वरिष्ठ पातळीवर गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. केवळ अर्ज दाखल झाल्यावर जागेची पाहणी करुन खर्च करावयाचे चलन देण्यास सदर तक्रारदारास झालेला विलंब (२७.१२.२००७ ते २०.२.२०१०) हा अक्षम्य आहे, त्यामुळे सदर विलंबासाठी भरपाई देणे उचित आहे. १०४ आठवडे विलंबासाठी विनियमातील तरतुदीनुसार प्रति आठवड्यास किंवा त्याच्या भागास रु. १००/– इतकी भरपाई देणे योग्य असल्याने १०४ x १०० = १०,४००/– इतकी भरपाई वि.प.ने ग्राहकास देणे योग्य आहे असा मंच आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

१) वर तपशिलात नमूद केल्याप्रमाणे १०४ आठवड्यांच्या विलंबाबद्दल प्रति आठवडा किंवा त्याच्या भागास रु. १००/– या प्रमाणे रु. १०,४००/– इतकी भरपाई वि.प.ने ग्राहकास द्यावी.

२) वीज जोडणी दिल्यावर पहिल्या दोन बिलींग सायकलमध्ये समायोजन करुन राहिलेली रक्कम चेकने अथवा रोखीने ग्राहकास अदा करावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )

सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :